लोकमत

# विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा सुरू

## पहिल्या दिवशी १०,५५३ परीक्षार्थी : २७ अभ्यासक्रमांचे पेपर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील उर्वरित सर्व परीक्षा ऑनलाइन घेण्याचे जाहीर केले. त्यानुसार या परीक्षांना गुरुवारपासून प्रारंभ झाला. परीक्षा पूर्ववत सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी विविध २७ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे पेपर झाले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ११,२३३ परीक्षार्थींपैकी १०,५५३ जणांनी ऑनलाइन पध्दतीने परीक्षा दिली.

विद्यापीठाने ऑनलाइन आणि ऑफलाइन पध्दतीने दि. २२ मार्चपासून हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू केल्या. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने विद्यापीठाने ६ ते १२ एप्रिल दरम्यानच्या परीक्षा स्थगित केल्या. त्यासह उर्वरित सर्व परीक्षा ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गुरुवारपासून परीक्षा पूर्ववत सुरू झाल्या. पहिल्या दिवशी बी.एस्सी. बायोटेक, आयटी., शुगरटेक, बीबीए., बीसीए., बीएसडब्ल्यू., बीआयडी., बीडीएफसी., बीएफटीएम., बी. व्होक., एमए., बीडीएस., बीएस्सी. कॉम्प्युटर सायन्स., एम. लिब., एमएसडब्ल्यू., एम. कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्यूएशन., एमसीए., एम. एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक., एम. ए. आणि एम. एस्सी. (भूगोल), एम. एस्सी., बी. एस्सी., बी.ए. या द्वितीय वर्षातील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. दरम्यान, पहिल्या दिवशी १०५५३ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठात वॉररूम कार्यान्वित ठेवली होती, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

### अशी झाली परीक्षा

या परीक्षांसाठी सकाळी साडेदहा ते साडेअकरा, दुपारी साडेबारा ते दीड, दुपारी अडीच ते साडेतीन, दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेपाच अशी चार सत्रे होती. ५० गुणांच्या पेपरमध्ये बहुपर्यायी स्वरूपातील २५ प्रश्न होते. विद्यार्थ्यांनी स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणकाचा वापर करून ऑनलाइन परीक्षा दिली.



# विद्यापीठ वसतिगृहातील कोव्हिड सेंटर सज्ज ठेवा

## महापालिका प्रशासक, पोलिस अधीक्षकांच्या सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ वसतिगृह १, २, ३ येथे महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात येणाऱ्या कोव्हिड केअर सेंटरला प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे व पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे, महापालिका उपायुक्त रविकांत आडसूळ यांनी भेट देऊन पाहणी केली. या ठिकाणी स्वच्छता, बेडची व्यवस्था, इलेक्ट्रिक व फायर ऑडिटची पूर्तता, ऑक्सिजन बेडची व्यवस्था व स्टाफ नियुक्ती तत्काळ करून सेंटर सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहात करण्यात येणाऱ्या कोव्हिड केअर सेंटरची पाहणी करताना प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे, उपायुक्त रविकांत आडसूळ आदी.**

शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. महापालिकेने शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, आयसोलेशन येथे कोव्हिड केअर सेंटर सुरू केले आहे. यात शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ३५० बेडचे सेंटर सुरू केले आहे. या ठिकाणी ८४ व्यक्तींना संस्थात्मक अलगीकरण केले आहे. विद्यापीठातील १, २, ३ वसतिगृहामध्ये सुरू करण्यात येणाऱ्या कोव्हिड केअर सेंटरची पाहणी केली.

महापालिकेने शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्र व अंडी उबवणी केंद्र या ठिकाणी कोव्हिड केअर सेंटरची तयारी पूर्ण केली आहे. शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी व आयसोलेशन येथील बेड क्षमता पूर्ण झाल्यानंतर इतर सेंटर सुरू करण्यात येणार आहेत. महापालिकेने या ठिकाणी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केलेली आहे.

यावेळी अतिरिक्त जिल्हा पोलिसप्रमुख तिरुपती काकडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रकाश पावरा, सहायक अभियंता चेतन लायकर उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात शुकशुकाट

कोल्हापूर, ता. १५ : कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुकारलेल्या संचारबंदीने शिवाजी विद्यापीठात आज शुकशुकाट पसरला. कर्मचाऱ्यांची केवळ पन्नास टक्के उपस्थिती राहिली, तर बाहेरून विद्यापीठात येणाऱ्या नागरिक व विद्यार्थ्यांना प्रवेशद्वार बंद राहिले.

विद्यापीठातील वसतिगृहे कोरोना रुग्णांसाठी पुन्हा खुली करण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या परिसरात बाहेरून येणाऱ्या नागरिकांना प्रवेश बंद झाला आहे. केवळ कर्मचाऱ्यांना त्यांची ओळखपत्रे पाहून प्रवेश देण्यात आला. ऑनलाईन शिक्षणाचे धडे देणारे प्राध्यापक अधिविभागात हजर राहिले. पीएच. डी. संशोधक विद्यार्थी संशोधनाच्या निमित्ताने संशोधनात व्यस्त होते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर विद्यार्थ्यांची अधिविभागात ये-जा सुरू होती.

विद्यापीठाचा परिसर गजबजलेला होता. पर्यावरणशास्त्र अधिविभाग, मानवशास्त्र इमारत व मुख्य इमारतीच्या परिसरातील कॅन्टिनमध्ये त्यांची वर्दळ होती.

Times of India

# SUK hostels to become Covid care centres

TIMES NEWS NETWORK

Kolhapur: Shivaji University Kolhapur (SUK) banned the entry of visitors to its campus till further notice after the Kolhapur Municipal Corporation (KMC) took over the hostels to convert them into Covid care centres (CCCs).

The municipal corporation is planning to restart the 400-bed CCC in the university hostels. Last year, the hostels were converted into a CCC and had benefitted thousands of the Covid patients in the area.

On any normal day, hundreds of visitors come to the university campus. Morning walkers also visit the lush green campus for their daily exercise.

Vilas Nandwadekar, the university secretary, said: "Gate 1 and 6, will allow only teachers, staff and their family members entry. Gate number 8 will be used only for Covid-related movements by the authorities. Rest of the entry points to the campus will be shut for all visitors."

Rahul Gayakwad



The KMC is planning to restart the 400-bed CCC in the university hostels

Currently, the Shivaji University Kolhapur is conducting exams for students who have opted for the online mode. The hostels have already been vacated. All offline exams have been stopped due to the lockdown. The offline exams will be conducted later.

"All exam-related activities will continue. For the staff involved in the exams, prior permission had to be sought from departments to enter the campus," said Nandwadekar.

तरुण भारत

# डॉ. आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने व्याख्यान

कोल्हापूर : भारताची एकता, अखंडता जपण्यासाठी, या देशाला कायम एकसंध राखण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत ३५२, ३५६ आणि ३०७ या तीन कलमांची केलेली योजना फार बहुमोल स्वरुपाची आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास अधिविभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी केले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्राच्या वतीने आयोजित व्याख्यानात 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय संरक्षणविषयक विचार" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेमध्ये डॉ. आंबेडकरांचे मोठे योगदान आहे. या प्रकल्पांतर्गत डॉ. आंबेडकरांचे अद्याप प्रसिध्दी झोतात नसलेला पैलू लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. महाजन यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अमोल मिणचेकर. आदी ऑनलाईन उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठ वसतिगृहात कोविड सेंटर उभारणार

## प्रशासक बलकवडे यांच्याकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ येथील वसतिगृहाच्या तीन इमारतींमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या कोविड केअर सेंटरची गुरुवारी प्रशासक कादंबरी बलकवडे व पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी पाहणी केली. याठिकाणची स्वच्छता, बेडची व्यवस्था, इलेक्ट्रिक व फायर ऑडिटची पूर्तता, ऑक्सिजन बेडची व्यवस्था व स्टाफची नियुक्ती तत्काळ करण्याच्या सूचना प्रशासक बलवकडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कोल्हापूर शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. महापालिकेने शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी (डीओटी), आयसोलेशन रुग्णालय येथे कोविड केअर सेंटर सुरु केले आहे. डीओटी येथे ३५० बेडचे सेंटर सुरु झाले आहे. सध्या याठिकाणी ८४ व्यक्तींचे संस्थात्मक विलगीकरण केले आहे. या आयसोलेशन रुग्णालयात ७१ बेडचे कायमस्वरुपी कोविड केअर सेंटर सुरु आहे.

महापालिकेने आता शेंडा पार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्र व अंडी उबवणी केंद्र याठिकाणी कोविड केअर सेंटरची तयारी पूर्ण केली आहे. डीओटी व आयसोलेशन येथील बेड जसे भरतील तशी इतर सेंटर सुरु करण्यात येणार आहेत.

सकाळ

# विद्यापीठाच्या विविध परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना आजपासून सुरवात झाली. ११ हजार २३३ पैकी १० हजार ५५३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने बी.एस्सी. बायोटेक, बी.एस्सी. आयटी, बी.एस्सी., बीसीए, बीबीए, बीसीए, बीएसडब्ल्यू, बीआयडी, बीडीएफसी, बीएफटीएम, बी. व्होकेशनल, एम.ए, बीडीएस, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, एम.लिब., एम.एस.डब्ल्यू., एम.कॉम, मास्टर ऑफ व्हॅल्यूएशन, एमसीए, एम.एस्सी. (नॅनो सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी), एम.ए., एम.एस्सी. (जिऑग्राफी), एम.एस्सी., बी.एस्सी., बी.ए. अभ्यासक्रमांच्या परीक्षेस विद्यार्थी बसले. त्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींची सोडवणूक विद्यापीठ व सॉफ्टवेअर परवठा कंपनीतर्फे करण्यात आली.

# विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. कोव्हिड-१९ विषयक नियमांचे पालन करून कार्यक्रम करण्यात आला.

जाहीर नोटीस

# विद्यापीठाच्या कोविड सेंटर्सची पाहणी

कोल्हापूर, ता. १५ : विद्यापीठाच्या १,२,३ वसतिगृहात सुरू करण्यात येणाऱ्या कोविड केअर सेंटरची आज प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे व पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी पाहणी केली. या ठिकाणची स्वच्छता, बेडची व्यवस्था, इलेक्ट्रीकचे व फायर ऑडीटची पूर्तता, ऑक्सिजन बेडची व्यवस्था व स्टाफची नियुक्ती तत्काळ करण्याच्या सूचना डॉ. बलवकडे व पोलिस अधीक्षक बलकवडे यांनी दिल्या.

महापालिकेने यासह शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्र व अंडी उबवणी केंद्र येथे कोविड केअर सेंटरची तयारी पूर्ण केलेली आहे. शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी व आयसोलेशन येथील बेड जसजसे भरतील तसतसे इतर सेंटर सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेने तयारी पूर्ण केली आहे. उपपोलिस अधीक्षक तिरुपती काकडे, उपायुक्त रविकांत आडसूळ, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रशासकी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश पावरा, सहाय्यक अभियंता (विद्युत) चेतन लायकर उपस्थित होते.